| MHKO100013812016 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ६०/२०१६** <br><br> तुकाराम सांबरेकर वगैरे /वि/ संतू लांडे वगैरे. |
|---|---|

**निशाणी क्र. ४० व ४१ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.२ यल्लाप्पा नरसू लांडे हे दिनांक ०२/१०/२०२२ रोजी, प्रतिवादी क्र.३ शंकर आप्पाजी लांडे हे दिनांक १४/०१/२०१७ रोजी व प्रतिवादी क्र.४ म-याप्पा आप्पा सांबरेकर हे दिनांक ०६/१०/२०१३ रोजी मयत झालेले आहेत व सदरचे अर्ज हे दिनांक ३०/०१/२०२३ रोजी दाखल केलेले आहेत. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसामध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचे वारसांबाबतची माहिती त्यांना वेळेत मिळू शकली नाही, तसेच प्रतिवादी हे मयत झालेचे त्यांना अलिकडेच समजून आले आहे. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा

काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या ब-याच विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जांचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु.३,०००/- (रुपये तीन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिवादी क्र.२ ते ४ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.04.17 18:01:17 +0530

( एस.ए.राठोड )
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १७/०४/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>$2^{nd}$ Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 17/04/2023 |
| Order signed by P.O. on | 17/04/2023 |
| Order uploaded on | 17/04/2023 |